अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या
मान्यतेनुसार राज्यातील खाजगी संस्थांना नविन
एम.बी.ए. महाविद्यालय सुरु करण्यास शासनाची
<u>मान्यता देण्याबाबत</u>

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
शासन निर्णय क्र.टिइसी-२००९/(१०४/०९)/तांशि-४,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : - १५ जून, २००९ .

संदर्भ:- अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे क्र. ०९/०१/ MS/MBA/२००९/३८, दिनांक १५ जून, २००९ चे पत्र.

**शासन निर्णय:-** अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने त्यांच्या संदर्भाधीन पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २००९-२०१० करिता खाली नमूद केलेल्या संस्थेस नविन एम.बी.ए. महाविद्यालय सुरु करण्यास खालीलप्रमाणे मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरुन याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

| अ. क्र. | संस्थेचे नाव | अभ्यासक्रमाचे नाव | प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|
| १ | ओझर विकास संस्थेचे विश्वसत्य कॉलेज ऑफ एम.बी.ए., गट नं. ८८७, ओझर-सुकेना रोड, (ओझर-एमआयजी), ता. निफाड, जि. नाशिक | एम.बी.ए. | ६० |

आता या शासन निर्णयाद्वारे उपरोक्त संस्थेस खालील अटी व शर्तीवर शैक्षणिक वर्ष २००९-२०१० पासून नविन एम.बी. ए. महाविद्यालय सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

४) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक ( तंत्रशिक्षण ) यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

३) सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणांसाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील तरतूदीनुसार संबधित विद्यापिठाची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

४) संबंधित संस्थेने संचालक ( तंत्रशिक्षण ) यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पध्दतीनुसार करण्यात येतील.

६) शिक्षण शुल्क समितीने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) अॅक्ट, १९८७ नुसार कारवाई करण्यात येईल.

ओझर विकास संस्था
ओझर
मिग

TRUE COPY
(DIRECTOR)
Vishwasattya College of MBA

Scanned with CamScanner

७) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

८) याशिवाय संचालक ( तंत्रशिक्षण) महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने

( भ. से. वानखेडे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक

कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे संबंधित संस्था (संचालकांमार्फत )

प्रत माहितीसाठी

अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, ७वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली ११०००१

सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई

निवड नस्ती.

C:\Documents and Settings\m\My Documents\Lole\TE4\Permission\Kasturi MBA.doc

Scanned with CamScanner